# काव्यकथा

१६६२
डांगे
काव्य
५५५५



REFBK-0013500
REFBK-0013500

ग. दि. माडगूळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि: ........

# का व्य क था

[ चार दीर्घ काव्यें ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 93500

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः ........................
क्रमांक ........................ नों दिः ........................

REFBK-0013500
REFBK-0013500

# काव्यकथा

कवि

ग. दि. माडगूळकर

किंमत तीन रुपये

प्रकाशक :
पंडित अनंत कुलकर्णी
कुलकर्णी ग्रंथागार
१८६ शनवार, पुणें २.

♤

© ग. दि. माडगूळकर

♤

प्रथमावृत्ति
२६ जानेवारी १९६२

♤

मुद्रक :
विष्णु गणेश माटे
विश्वकर्मा मुद्रणालय
टिळक रोड, पुणें २.

# अं त रं ग

१ गंगाकाठीं

२ शिववैराग्य

३ चित्रवैनायक

४ कन्याकुमारी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32203 वि: 7101
क्रमांक 9554 नों दि: 25.11.58

# काव्यकथा

# गं गा कां ठीं

कुण्या जन्मिचें स्मरण नव्यानें उमटे या ओठीं
"एक मराठी काव्य हरवलें गंगेच्या कांठीं!"
गंगेकांठीं कधीं नांदली मराठिया वाणी?
रचिलें कोणी काव्य कशावर? गमाविलें कोणी?

इतिहासाचीं चाळुं लागली जिज्ञासा पानें
नयन मनाचे लंघुं लागले विस्मृतिचीं रानें
...जातां जातां पडलीं मागें शतकाधिक वर्षें
गंगेकाठीं 'भूत' उजळला दृष्टीच्या स्पर्शें

दंतकथांना फुटल्या जिव्हा सहगानासाठीं
"एक मराठी काव्य फुलारे गंगेच्या काठीं!"

●

गंगेकाठीं वसे पेशवा गमावुनी गादी
बरबादींतच नांदत होती दुबळी आबादी
ब्रह्मावर्तीं उठली होती दख्खनची धाटी
मुळामुठेचें तीर उगवले गंगेच्या कांठीं!

मराठी ग्रंथ
93500
दा. क्र.

इंग्रेजांच्या हुकुमावरती हुंकारत हांजी
वांझ वैभवा भोगित राही शेवटचा बाजी
'खेळ' खेळतें खुळें बाहुलें आंग्लांच्या हातीं
शिरपेंचासह तुरा तरीही होता वर माथीं

तुरा-पगडिला मानित होते अजुनी जन वेडे
अजुनी होती हुकमत, दौलत, पागा, गज, घोडे
अजुनी होतीं विप्रभोजनें, यज्ञ, होमशाळा
धनाभोंवतीं झाले होते आश्रितजन गोळा!

आश्रितांत त्या होता कोणी सखोपंत जोशी
दशग्रंथी तो भोळा ब्राह्मण विनयी, मितभाषी
त्या जोश्याची इवली कन्या मैना नांवाची
गुणरूपें ती कौतुकमीता अवघ्या गांवाची

अक्षरात्रिच्या मध्यानीसम केस तिचे काळे
चंद्रज्योती निळ्या उजळती कोंकणस्थ डोळे
ओठांवरती लालस लेखा कोमल हास्याची
तिच्या गतीच्या सहजतेंतही लज्जत लास्याची

अंगलटीवर उटी केशरी, तिची तिला कांती
चांदण्यांतल्या क्षणां सघनता, तशी दंतपंक्ती !

अजुन बाळ ती, नाचत होती अंगणांत हदगा
लालपुरीची शिस्त जरी तिज शिकवी फरिगदगा

देववाणि ती पित्यापासुनी जरि होती शिकली
जमवुन पोरी होती खेळत झिम्मा भातुकली

तिच्या वयाचा नव्हता तिजसी पुरता पडताळा
पदर उडे तों चढवी वरती श्रावण-झोंपाळा !


तारुण्याचा नुकता होता लागत तिज वारा
नुकतें कोठें झालें होतें वय वर्षं बारा

भिऊं लागलें होतें भाषण ओलांडूं अधरां
हात सावरूं शिकले होते छातीवर पदरा

आइवेगळी अशी वाढतां विप्रघरीं पोर
गरिब बापड्या पित्यास लागे अती तिचा घोर !

सहज एकदां रविपादोदक यजमानां देतां
श्रीमंतांच्या कानीं घाली ब्राह्मण ती चिंता

हंसुन बोलले राव, डोलली भिकबाळी कानीं
"मोरोबाच्या मनूसारखी होइल ती राणी !"
तेव्हांपासुन रमला स्वप्नीं सखोपंत जोशी
आभासावर कोरूं लागला कन्येची झांशी...
खरेंच मैना असेल कां ती भाग्यवती मोठी ?
एक मराठी काव्य फुलारे गंगेच्या कांठीं !



नव्हे दिवाळी, नव्हता दसरा, सण नव्हता कांहीं
राव बाजिच्या वाड्यावर तर धुंद रोषणाई !

तेवत होते दीप, मशाली, लाल चंद्रज्योती
भुईनळ्यांचीं झाडें गगनीं सळाळुनी जाती
तोफेऐसा स्फोट भूवरीं होउनिया जंगी
आकाशावर तुटतीं तारा तप्त सप्तरंगी
बाण निसटती, फिरतीं चक्रें, वक्रगती स्तंभ
गंगेवरती त्या सर्वांचें रंगे प्रतिबिंब !
घराघरांतुन लोक जागती सोडुनिया सुस्ती
करित धन्याचें कौतुक जागे दासांची वस्ती
त्या दासांचा धनी पांघरुन जरतारी दास्य
पाहत होता प्रशासकांचें नर-ललना-लास्य
संगमरवरी लादीवरती आंग्लपुत्र जेते
निज रमणींना करें कवळुनी हळुं नाचत होते
कटी कटीला भिडे, हनुवटी हनुतें गोंजारी
शेजाऱ्याचें धुंद कबुतर उचली शेजारी
कमरेभंवतीं कर तरुणीच्या, दुसरा कर हातीं
डुलत डोलवित वैश्य गोरटे निज गीतें गाती

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ... विः ...
क्रमांक ... नों दि ...



त्या गीतांना साथ देतसे कैफभरा सूर
महालांत त्या आनंदाचा हेलावे पूर
धुक्यासारखा चढे स्वरांचा थर वातावरणीं
धरा सोडुनी बरी सरकती मखमाली रमणी



पराजिताच्या पाहुणचारा सोकावुन भारी
मिरासदारी भोगुन रमले गोरे अधिकारी
उरांत मदिरा, करिं मदिराक्षी, वाद्यांची साथ
झेलित होते स्वर्गसुखातें आंग्ल गात गात

सुवर्णकेशी मदालसांचें लयमंथर वक्ष
राव बाजिला याविण कुठलें लोभनीय लक्ष्य ?

गदारोळ हा पहात होते दुरुन दोन डोळे
औत्सुक्यच तें खेळत होतें बाल ुलभ भोळें

तोल सांवरित वळला तिकडे गोरा अधिकारी
उरली मैना, दूर पळाल्या बुजलेल्या पोरी

डोळ्यांमधल्या औत्सुक्यावर तरारली भीती
तों गोऱ्यानें हात पकडला मैनेचा हातीं

काय घडे तें कुणा न कळलें तोंच अकस्मात
सर्वांगासह गवसे मैना लालस विळख्यांत

अनामिकानें तृप्त चुंबिली अनाघ्रात बाला
सीमेवरती जखमी यौवन मुकलें बाल्याला

पंख कोठलें कळीस ? झाला कंप पाकळ्यांचा
ओठांमाजी हांक कोंडली गुदमरली वाचा

जागेवरती खिळुन राहिले बघ्ये महाभाग
एकाच्याही माथीं नाहीं चाळवली जाग !



विद्ध पाडसापरी पळाली आवेगें मैना
अंधारच हो तिच्या लोचनां जगडव्याळ ऐना

नच झालेली जखम तिला हो मरणाहुन मोठी
मुसमुसून ती रडूं लागली गंगेच्या कांठीं

जखम वाहती जशी धरावी, तसे धरून ओठ
मुग्ध यौवना मैना रंफुदे फिरवुनिया पाठ !

त्या पाठीवर तोंच कुणाचीं थरथरलीं बोटें
शहारली ती, वळली मैना, कोण असे कोटें ?

पुसट आकृति नवतरुणाची, शब्द ओळखीचा —
" भिऊं नको ग मैने, राघू मी राजापुरचा



जें घडलें तें पाहुन झाली चित्ताची आग
छातीमाजी प्रदीप्त झाला असे सर्पयाग

मीही ब्राह्मण; तुझ्या मनाची उमगे मज चीड
धीर द्यावया अनुसरलों तुज, सोडुनिया भीड

या यागीं मी जाळिन आतां जातच सर्पांची
तुझ्या कपाळीं लाविन त्यांच्या रक्षा दर्पांची

धर विश्वासा, जरी असे मी केवळ शागीर्द
शागिर्दांतुन आज उसळला उमदा रणमर्द

शागिर्दानें न्याय शिकविला पेशव्यास पूर्वीं
तसेंच कांहीं राघू घडविल फिरूनी रणपर्वीं ! ”

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों दि: ...



उभी राहिली मैना ऐकुन ओजस्वी वाणी
सूडाग्नीनें क्षणांत जळलें नयनींचें पाणी
" राघू—" म्हणुनी तिनें टाकली छातीवर मान
शूरत्वाचा असाच करती अबला सन्मान !
ब्राह्मण-कन्या घरां परतली शागिर्दांपाठीं
एक मराठी काव्य फुलारे गंगेच्या कांठीं !

●

सखोपंत तर झाला मूर्च्छित ऐकुन ही वार्ता
" हाय ईश्वरा, ब्राह्मणास या कोणी नच त्राता ! "
श्रीमंतांनीं केली समजुत दीन आश्रिताची—
" नीतिकल्पना अम्हावेगळी असे इंग्रजांची
अशा चुंबना गणति न त्यांच्या समाजांत पाप
उगा कशाला करुनी घेतां जोशी, संताप ?
वात्सल्यानें तुम्ही नाहिं कां कुरवाळित लेक ?
स्वस्थ असावें आवरुनिया मनिंचा उद्रेक ! "



" श्रीमंतांच्या समक्ष कैसें विपरित हें झालें ?
कसें सजावें आतां माझ्या अंगणांत बहुलें ? "

—आर्त प्रश्न हा ऐकुन चढल्या बाजीच्या भुंवया
" आश्रित तुम्ही कुणां लावितां बोल असा वांया ?
अमुच्या हातें आम्ही लावूं मैनेचें लग्न
स्वस्थ असावें तुम्ही आपुल्या याज्ञिकांत मग्न ! "

भग्न मनानें मुका परतला सखोपंत जोशी
उगा ओढवे गरिबावर त्या इतराजी खाशी !
कुजबुज झाली सुरूं त्यावरी ब्राह्मण शिष्टांची
निंदाश्रवणें जोश्याला ये कळा श्रमिष्टाची

पुनः पुन्हां तो करूं लागला गंगाजल-स्नान
अन्न लागलें तयास खाऊं, तो शिणवी अन्न
धन्यापुढें तर जाउं न देई त्यांची इतराजी
त्यांत ज्वरानें धरेस खिळला धनी राव बाजी !

नयनीं ज्वाळा घेउन वाढे ज्वालेसम मैना
तिला पाहतां एक लागतो दुसऱ्याच्या काना
राघू-मैना भेटत होतीं उघड्यावर दोघें
अबोध बोली बोलत होतीं प्रेमें वा रागें

कथा तयांची चघळीत चोथा गिळी ब्रह्मवृंद—
" दशग्रंथ्याला मिळे जांवई ठोंब्या शागिर्द !
उष्ट्या ताटावरी मारिते श्वान मात्र ताव
कुळवंताचा लेक न घेइल मैनेचें नांव ! "

राघू-मैना नव्हतीं ऐकत कुत्सित ही वाचा
वर्तमानिं तीं घडवित होतीं घाट भविष्याचा
बापासाठीं तरिही मैना रांधी सैंपाक
तोही होता गिळितच सारें अग्नीसम मूक



पिता-कन्यका यांच्यामध्यें मौनाची भिंत
मैनेला पण नव्हती उरली ममता वा खंत !
दुरावल्या तिज सख्या सहेली, अंतरला बाप
भरित राहिला काळ पळांनीं घटिकांचें माप !
अशांत आली अंतिम घटका बाजीची जवळी
मरतां मरतां भ्याड जीव तो लाचारी कवळी
रामनाम त्या येइल कुठलें पाप्याच्या ओठीं ?
परकीयांचें प्रेम तयाच्या कळवळलें पोटीं
" इंग्रेजांना नको दुखावूं जन्मांतरिं नाना ! "
हेंच बजाथी दत्तकपुत्रां बाजी जातांना !

घोळ मांडिती आप्त मृताचे जधीं इर्द गिर्द
शुष्क लोचनें बघत राहिला राघू शागीर्द
सुखशय्येस्तव जगला बाजी, शय्येवर मेला
रावबाजिचा ग्रंथच अवघा श्रेयाविन सरला !
श्रीमंतांचें प्रयाण होता कोसळला जोशी
अनवाणी तो वेडा ब्राह्मण जवळ करी काशी
लिखित कोणतें राघू-मैना यांच्या ललाटीं ?
एक मराठी काव्य फुलारे गंगेच्या कांठीं !



पितृवियोगें नाहीं रडली लेक ब्राह्मणाची
रघूच्या तर नयनिं भावना एकच सूडाची
	राघूवांचुन नव्हती मागत मैना आधार
	एका ताऱ्यावांचुन तिचिया गगनीं अंधार !
अंधेरानें तोंच घातला राज्याला विळखा
इंग्रेजांनीं स्थगित ठेवला नानांचा तनखा
	अधिसत्तेनें अमान्य केलें वारस रावांचें
	ब्रह्मावर्तीं राज्य राहिलें केवळ नानांचें
अर्ज विनंत्या झाल्या लाखों ताम्रमुखांलागीं
राजपुत्र ना तरिही ठरले नाना हतभागी
	हतभाग्याला अशा द्यावया योग्य क्षणीं सल्ला
	ब्रह्मावर्तीं आला मुस्लिम उमदा अजिमुल्ला
अजिमुल्ल्यानें सागर लंघुन नेली फिर्याद
लंदनांतही नाहिं लागली नानांची दाद !
	गेला तैसा आला हलवित हात यवनमित्र
	संतापानें जळूं लागले बाजीचे पुत्र

आठवलें त्या पुत्रांलागीं दूध पांचवीचे
आठवले निज पूर्वज आणिक ब्रीद मराठ्यांचें
आठवला त्यां प्रताप अनुपम वीर शिवाजीचा
आठवला त्यां अतुल पराक्रम पहिल्या बाजीचा!

रक्तामधला परशुराम घे खांद्यावर परशू
बोले नाना—"आंग्लांवर या आग चला वर्षूं!"
हर्ष दाटला मग राघूच्या मनामानसांत
भ्रांत तयाचें चित्त उतरलें पुन्हा माणसांत



सहज शिकला शागीर्दच तो हुक्का भरतांना
"सत्य!" गर्जुनी उभे राहिले रक्तनेत्र नाना
"दुरुस्त!" बोलून टाळी मारी मुस्लिम अजिमुल्ला
"तथास्तु!" त्यावर राघू ब्राह्मण ओठीं पुटपुटला

हलूं लागलीं सूत्रें—यात्रा केली नानांनीं
उत्तर, दक्षिण—जागे केले निजले सेनानी
गुप्त खलबतें करूं लागले राजवंश देशीं
अजिमुल्ला तर जोडुं लागला धागे परदेशीं!

नबाब, राजे करूं लागले भेटीवर भेटी
करित फलटणी फितुर निघालीं 'गेहूं की रोटी'
रक्त रंगिचें कमळ जोडितें रक्ताचें नातें
वेष बदलुनी फिरूं लागले स्वयंभूत नेते

धुम्यांतूनहि धुमसुं लागली तोफांची दारू
खड्गालागीं निसणा सांगे, "फिरंग्यास मारूं!"
अर्धंतपानें पुनः हंसूं ये मैनेच्या ओठीं
साद चोरटा काढुन सांगे राघू निज गोठी



त्या दोघांना निंदुन थकल्या जनजिव्हा लाख
बोलत होतें बिठूर—' मैना राघूची राख!'

सत्य आंतलें जाणत होता केवळ परमात्मा
सतीच होती शीलें मैना, राघू पुण्यात्मा

असामान्य हें सामान्यांतिल प्रीतीचें नातें
नानांवांचुन अन्य कुणाला मुळीं मान्य नव्हतें

ज्या समयास्तव अधीर होता जागृत जलबिंदू
आली आली नजिक वेळ ती—उफाळला सिंधू

मैना राघू एकामेकां भरविति गहुं-रोटी
एक मराठी काव्य फुलारे गंगेच्या कांठीं!



प्रीतकवळ तो घेत हांसली मैना मनसोक्त
" लाव " बोलली, " माझ्या भाळीं गोऱ्यांचें रक्त "


" घडी दूर ती नाहीं आतां प्राणप्रिये मैने
मीच काय गे, चिडुनी उठली त्यांच्यावर सैन्यें

दक्षिण-उत्तर नांदायाची पुनः पेशवाई
श्री नानांच्या नांवें फिरुनी फिरायची द्वाही ! "

—हे राघूचे बोल प्राशितां हळव्या कानांनीं
मैंना-नयनीं साकारुन ये राघो सेनानी !

राघूलाही दिसूं लागली वधुवेषीं मैना
" चिरंजीव व्हा ! " म्हणती प्रेमें दोघांना नाना

क्षणभर सुटलें भान, सरकला पुढें वीर धीट
अधर सखीचे शिवूं धांवले राघूचे ओठ
एक उसासा उच्छ्वासांतुन उडला अतितप्त
शहारूनिया मैना झाली कोपें आरक्त!
" विसरलास का मूढा, माझ्या प्राणांची आण
शपथपूर्तिविन वांछितोस कां प्रीती निष्प्राण?



सरस्वतेश्वर सांगिल तुझिया बोल प्रतिज्ञेचे—
'मंगलसूत्रीं ओविन मैने प्राण इग्रजांचे'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
93400
दा. क.

विसरुनिया ते धजसी या कैसा ओठ विटाळाया
यासाठीं कां जगविलेंस मज नराधमा, वांया ?

फिरंगियांच्या निःपाताविण मी न तुझी कोणी
आशेखातर नको विटाळूं गंगेचें पाणी !"

लज्जित राघू तसाच फिरला वळवुनिया मान
कुडीच चिडवुन सोडी अपुले वाऱ्यावर प्राण

तोडुन तुटतिल कैशा मैने, जन्माच्या गांठी ?
एक मराठी काव्य फुलारे गंगेच्या कांठीं !

●

वाऱ्यावरती गेला राघू भरारुनी दूर
मैनेच्या मग नयनीं वाहे अश्रूंचा पूर

पुन्हां न पडली त्या दोघांची घाटावर गांठ
कानपुरावर एकाएकीं धडाडला स्फोट

म्हणूं लागले, लोक " भडकलें बंड शिपायांचें "
शूर पुढारी त्यांस मिळाले पुत्र पेशव्यांचे

भिउन पळाले कानपुरांतुन अधिकारी गोरे
रस्त्यावरती रडतीं त्यांचीं भेदरलीं पोरें

हिंदू-मुस्लिम एक होऊनी गोऱ्यांवर उठले
दिसेल तेथें अंग्रेजांना नानांनीं पिटलें

नानांसंगें असेल गेला राघू रणतीर्थीं
बघूं लागली मनिंच्या नयनीं मैना ती मूर्ती !

ती मूर्ती तर नृसिंह जैशी रणांगणीं नाचे
तलवारीनें छाटित डोकीं, ओठ इंग्रजांचे



नव्हतें माहित कोण चावला मैनेच्या रूपा
ठेंचित सुटला राघू पुढतीं येईल त्या सापा

असे सहस्रों सैनिक होते रणांत रणमस्त
आंग्लाईचा होउं लागला कानपुरीं अस्त

टाक टाकुनी उचली खेटक खड्गासह टोपे
चिडला सागर प्रलयाविण तो कैसा आटोपे ?

रस्तोरस्तीं रक्त वाहिलें कानपुरीं मार्गीं
तृप्त जाहले असतिल बाजी, चिमणाजी स्वर्गीं !

घनगर्दींतुन श्वेताश्वातें नाना दे टांच
उषाभास्करापरी तळपती पगडी शिरपेंच

शौर्य प्रकाशे, दास्य विनाशे, मुक्त आसमंत
कानपुरावर झाले विजयी नाना श्रीमंत

श्रीमंतांच्या नांवें फिरली नगरांतुन द्वाही
उत्तरेंतली हुकुमत जिंकी पुन्हां पेशवाई !

विजयरात्रीला अझिबेगमची बैठक ये रंगा
तांडव-तुष्टा शृंगाराची नाचे रसरंगा !

तात्या टोपे, अजिमुल्लांचा झाला सन्मान
श्रीमंतांनीं दिलें सेवकां मुक्त करें दान

त्यांत अचानक आला आठव त्यांना राघूचा
मागमूस पण नव्हता तेव्हां सभांगणीं त्याचा
धुंडुं लागले सैनिक रस्ते कोठी अन् कोठी
एक मराठी काव्य फुलारे गंगेच्या कांठीं !

ब्रह्मावर्ती दचके मैना वाजतांच दार
ज्योत समइची पुढें करी ती, हलला अंधार
अंधारांतुन प्रकाशांत ये तिचा बाळमित्र
विजयोन्मादी तारुण्याचें पुढें उभें चित्र
" तलवारीला लाव भाळ या भाग्यवती फक्त
या धारेवर कुंकू झालें गोऱ्यांचें रक्त !
शागिर्दानें रणीं मारले रक्तसर्प साठ
आठवुनी तुज रणीं छाटले कैकांचे ओठ
कानपुरीं तर नाहीं उरला औषधास गोरा
हिंदुस्तानीं जाइल वार्ता सांगत ही वारा.

इतुक्यामाजीं येइल कानीं विजयाचा डंका
खल्क खुदाका, मुल्क शहाका, अंमल नानाका !



होते नाना म्हणुन साधली आज वचनपूर्ती
चिरंजीव हो कीर्ती त्यांची ! तुझी सखे स्फूर्ती !"
काय करावें तेंच सुचेना मैनेला तेव्हां
तिच्या तनूच्या कणाकणावर अंकुरल्या जिव्हा
रोमांचांनीं भारून गेलें तिचें अंगअंग
अभिमानानें उरीं उसवली कांचोळी तंग !

“ राघू ” म्हणुनी अंगरख्याची चुरि ती बंधाटी
एक मराठी काव्य फुलारे गंगेच्या कांठीं !

गुढ्या तोरणें उभीं राहिलीं त्या ब्रह्मावर्ती
सनई नौबत गाउं लागली नानांची कीर्ती

पुन्हां जाहलें राज्य ब्राह्मणी, प्रास्थपित तख्त
अंग्रेजांना जिंकुन झाले नाना अभिषिक्त !

राजमुखानें मुक्त प्रशंसित झाले रणमर्द
सन्मानित हो त्यांत रांगडा राघू शागीर्द

श्रीमंतांनीं स्वयेंच कथिलें सभाजनां सत्य —
“ राघूसम या होणें नाही युगांतरीं भृत्य !

भृत्य कशाचा, बाळमित्र हा आम्हा भावांचा-
चतुर्थ सुत हा समजा राघू बाजीरावांचा !

दास्यमुक्तिच्या विचारांत हा झाला नित साथी
त्या कार्यास्तव अजिंक्य लढला घेउन शिर हातीं !”

श्रीमंतांचे शब्द ऐकतां राघू गहिंवरला
धांव घेउनी श्रीमंतांच्या चरणांवर पडला

आनंदाश्रू गळले त्याचे श्रीमंतांपायीं
मिठी सोडुनी तरिही राघू हल्ला तिळ नाहीं !



कुरवाळुनिया त्यास उठविलें नानांनीं प्रेमें
पूनित केला स्वामिभक्त तो स्वामींनीं क्षेमें

त्या क्षेमानें न्हां गहिंवरे राघूची वाचा—
" सात जन्म मी सेवक होईन या शुभचरणाचा
प्राणप्रिय तें त्यागिन अथवा कवटाळिन मरणा
कधिं न द्यायचा परंतु अंतर पावन या चरणां ! "

प्रसन्न झाली या वचनावर खाशांची स्वारी
शागीर्दाला दिली असामी, शेला जरतारी !
दरबारांतुन राणीवंशीं आले मग राव
मैना दृष्टिस पडतां म्हणती, " घ्या वैनी नांव ! "
निज भाग्याचा तदा वाटला मैनेला हेवा
म्हणे, " काय ही पदवी आली अभाग्यास देवा ! "
श्रीमंतांनीं जाहिर केलें गूज तिच्या मनिंचें—
" वाड्यावरतीं लग्न होऊं द्या राघू-मैनेचें ! "
राघू - मैना दोघें झालीं ऐकुन तें धन्य !
काळवंडुनी तोंडें म्हणती आश्रितजन " मान्य ! "



आठवड्याचा अवधी होता जरी मुहूर्तास
वाड्यावरतीं सजूं लागले बहुलें, आरास
गरिबासाठीं उदार झाली धनिकांची कोठी
एक मराठी काव्य फुलारे गंगेच्या कांठीं

●

हाय ! ओढवें अरिष्ट दुसरें, पुन्हां पडे धाक
कानपुरावर चालुन आला आंग्ल हॅवलॉक !
एकाएकीं वियोग प्रेमाला दोन प्रेमिकांत
नानांसंगें पुनश्च राघू घुसला युद्धांत
कानपुरावर बिमोड झाला धनी पेशव्यांचा
ब्रम्हावर्तीं कहर उडला वार्ता अफवांचा—
"येतिल गोरे आणिक लुटतिल धन, बायां, पोरें
धरून नेले धन्यास त्यांनीं तिकडे परभारें !"
श्रीमंतांचें खाउन होतीं सुटलीं जीं पोटें
त्या पोटांतच धन्याविषयिंचा तिरस्कार दाटे

भीरू कोणी हलवुं लागले तेथुन संसार
जीवासाठीं कुणी पळाले सोडुन घरदार
ज्याला त्याला पडे भयानक मरणाचा धाक
मैनेचा तर जळे मनोरा, ढांसळली राख
स्वतःस विसरुन रडे पोर ती राघूच्या दैवा
धांवुं लागली मार्गीं त्याच्या हांकारित नांवा
सांजवातही नाहिं लागली मग ब्रह्मावर्ती
काळा बुरखा घेइ मुखावर नानांची कीर्ति !



सुरूं जाहलीं मुकीं स्पंदनें खाशा वाड्यांत
नकळे कोठें होता राघू अशा रगाड्यांत !

काळोखावर दौडत आल्या घोड्यांच्या टापा
परत परतले होते नाना गिळुनी संतापा

नाना, बाळा आणिक राऊ पुत्र पेशव्यांचे
पिंडीवरुनी गळलें होतें त्रिदळ शंकराचें

नव्हेत इंग्रज, याचा काढुन पुरता अंदाज
वाड्याभंवतीं गोळा झाले रडके आवाज

आवाजाची विरली कुजबुज, बरळे अंधार—
" स्त्रियांस घेउन धनी निघाले गंगेच्या पार ! "


पुतळ्यासम ती थांबे मैना ऐकुन ते शब्द
राणीवंशीं होता राघू दुःखानें स्तब्ध !

बोलायाचा प्रसंग नव्हता, ज्याचें तो जाणें
थोरां घरचें 'अमोल' जमवी राघू कष्टानें

शेल्यावरतीं एका जमवी जवाहिरें, मोतीं
समर्थ गुरुच्या छाट्या, भगवद्गीतेची पोथी

अनुक्रम ३२२०५ वि: ८१।१
क्रमांक ७५५५५ नों दि २६।३

विघ्नेशाची मूर्ती , उजव्या वळणाचा शंख
पुष्प वडाचें एक अमोलिक , शिवबांचा लेख
शेल्यामाजीं बांधुन करिं हें राघू गांठोडें
सज्ज जाहले मेणे तोंवर फुरफुरले घोडे
गंगेकांठीं दृश्य तमावर रामवियोगाचें
रुद्ध शब्द तों लोक ऐकती खुद्द पेशव्यांचे —
"काष्ठा भिडते काष्ठ सागरीं, खळाळतां लाट
ओसरल्यावर लाट, तयांची कुठली मग भेट ?
तुमच्या अमुच्या ऋणानुबंधा आज पडे खंड
तडीस नेऊं असेंच आम्हीं उठलेलें बंड !



दैवबलानें वांचलोंच तर येऊं या स्थाना
नातर आतां शेवटचा हा प्रणाम सर्वांना!

नका कुणीही येऊं संगें वख्त असे बांका
सुचेल तैसें तुमचें तुम्ही पाऊल जगिं टाका!"

मुके हुंदके उठले, नुरली सीमा मग शोका
नावाड्यांनीं जळीं लोटली दुर्दैवीनौका!

घाटावरतीं उभा थरथरे राघूचा देह
ओढुं लागला त्यास प्रवाहीं नानांचा स्नेह

एक पायरी घसरे राघू घाटाची खालीं
गर्दीमधुनी तोंच तयाची वाग्दत्ता आली

करकचुनिया तिनें ओढला राघूचा हात
"कोठें जाशी अशी सोडुनी मैना वणव्यांत?"

मान वळवुनी बोले राघू, "प्राणप्रिय मैने,
तुझ्याहि कानीं पडलीं होतीं नानांचीं वचनें—

'भृत्य कशाचा, बाळमित्र हा आम्हा भावांचा
चतुर्थ सुत हा समजा राघू, बाजीरावांचा!'



—कुटुंब अवघें दूर चाललों गंगेतुन माझें
तुझियासाठीं दूर राहणें मजसी का साजे?

धर्मपत्नि तूं सांग कोणता विहित मला धर्म?
स्वार्थ कोठला यांत, आणखी कुठलें सत्कर्म?"

पळभर झाली मूक राघुच्या प्रश्नावर मैना
आणि बोलली, "नकोस देऊं अंतर नानांना!"

"खरी वीर तूं मैने, माझ्या प्रीतीच्या देवी!
विजय मिळवुनी पुनश्च येऊं याच बिठुर गांवीं

विवाह अपुला इथें व्हायचा वाड्यावर खाशा
अमर आपुली प्रीत साजणी, अमर उरीं आशा!"

बोलत बोलत राघू घेई उडी प्रवाहांत!
निरोप देतां तमीं थरारे मैनेचा हात!

तीरासम तो जाउन भिडला राघू नौकेला
जरा थांबली नाव, ऐकतां त्याच्या हांकेला—
" नौकेमाजीं चढवा किंवा बुडवा गंगेंत
श्रीमंतांच्या सन्निध व्हावा दासाचा अंत!"

दासहट्ट हा अटळ जाहला धनी पेशव्यांना
चढला राघू, निरोप देई तोंच नाविकांना
स्वयेंच मारित वल्हीं जाई, सरला विश्राम
कुणास ठावें कुठचा होता पुढचा मुक्काम!

तीरावरुनी भकास डोळे मैनेचे बघती
दिसतां दिसतां विझली तरल्या नावेवर बत्ती!
गंगेकाठीं कोसळली ती, पडली बेशुद्ध
"राघू...राघू..." बोलत होता कंठ तिचा रुद्ध!

कोठें मैना, कोठें राघू पृथ्वीच्या पाठीं
एक मराठी काव्य फुलारे गंगेच्या कांठीं!

●

आग लागली ब्रह्मावर्ता, कोसळले वाडे
अर्धमृतांना तुडवित गेले गोऱ्यांचे घोडे

खिंडारांतुन फिरूं लागली मैना मग वेडी
" राघू...राघू... " म्हणत सारखी निःश्वासा सोडी !

जळत चाललें बंड तरीही उभ्या भारतांत
दिल्लीशासह वंश जळाले त्यांत असंख्यात

धारातीर्थी अगणित मेले देशाचे भक्त
ग्वाल्हेरीवर पुन्हां स्थापिलें श्रीमंतें तख्त

त्या तख्ताचे पुनश्च तुकडे फितुरीच्या पायीं
नकळे कोठें पुढें भडकली शेष पेशवाई !

वर्षें गेलीं; तरी न दिसला राघू मैनेला
आंग्ल राणीचा अंमल अंतीं देशावर आला !

पुन्हां जाहले सुरू पूर्वींचे आंग्लांचे नाच
पार तडकली मग मैनेच्या मेंदूची कांच !

उभी ठाकली मुक्तकेश ही गंगेच्या कांठीं
मुक्त बरळलें हास्य खुळीच्या सुकलेल्या ओठीं

त्या हास्याचा उंचावुनिया ओसरला साद
गंगेसंगें करूं लागली मैना संवाद—
"तीन्हीं विश्वीं प्रवास करितें तीर्थ तुझें गंगे,
तीन्हीं लोकां धुंडाळिन मी येउन तुजसंगें
कुठें तरी मज घडेल ना गे राघूची भेटी?
पतितपावने, देह फेकितें, पसर तुझी ओटी!"

सीतेसम ती शुचिता शिरली मातेच्या पोटीं!
"एक मराठी काव्य हरवलें गंगेच्या कांठीं!"

"मनोरथाच्या तळीं उतरला मनांतला पार्थ
मनोनिवासी अनंत सांगे फिरुनी गीतार्थ"

ताम्रपटासम आल्या हातीं या कुठल्या ओळी
कुरुक्षेत्र हो हृदय कुणाचें ? कुठल्या स्थळकाळीं

इतिहासावर ठसा नसे या थोर प्रसंगाचा
जरतारी हा समय कोठला भगव्या रंगाचा

उत्तरार्ध तों गाउं लागली चक्षुष्मति वाणी
साकारुनि ये पुढें खळाळत कृष्णेचें पाणी

त्या पाण्यांतच मिळे येउनी तुंगेचा ओघ
प्रीतिसंगमीं दोघींचाही उतरे आवेग

संथ जाहलें पाणी, दाटे शांतताच मूर्त
दक्षिण देशीं ख्यातनाम तें निवृत्ती–तीर्थ

त्या तीर्थावर हिंदुनरपती आला शिवराजा
निज सैन्याच्या बळें उघडुनि दक्षिण दरवाजा

वाळूमाजीं उभी राहिली शिवबांची घोडी
सहस्रावधी सेन संगें; दूर उभी थोडी

तळीं उतरले श्री शिवराजे, झाले अनवाणी
पुढें होउनी नेत्रा लाविति तीर्थांचें पाणी

जललहरींवर पोहत होता सांध्यरंग धुंद
वाहत होता वसंत वारा गंधासह मंद

शिवरायांना जळांत दिसलें हलतें प्रतिबिंब
नकळत झाल्या उभय पापण्या ओलावुनि चिंब

प्रतिबिंबानें तातसुतांची आठवली भेट
असाच झाला होता संगम, असाच तो थाट

अशीच होती गूढ शांतता, घृतपात्रीं बिंबें
कुठलें दर्शन पुन्हा पित्याचें आतां जगदंबे

दाटुनि आला गहिंवर कंठीं थरथरले ओठ
बोलुं लागलें चित्त मनासी शौर्याहुनि धीट

" तुझियासाठीं बंदिवास त्या झाला जनकाला
पुत्र म्हणुन तूं कसलें सुख त्या दिधलें जीवाला ?

जनक माउली एक म्हणुन तूं आदरली माता!
मिटले डोळे तिचे मृत्युनें तूं राजा होतां

तुटुनी गेलीं मुळें, वाढणें पुढें कशा शाखा
पुत्र तुझा तर भीक न घाली जनकाच्या धाका
घोड्यावरती उभी जिंदगी, असुखी तव जाया
संसारहि ना तुला साधला वय गेलें वाया "



उगाच झाली उदास वृत्ती ढिलावलीं गात्रें
साइखड्याचा खेळ विश्व हें, परहातीं सूत्रें
" आप्तमित्र तूं रणीं मारिले जगसी कां मागें "
तोंच बुडाला सूर्य, दाटलें तम गगनीं वेगें

चक्र राहिलें तसेंच माथीं फिरत विचारांचें
निःश्वासांना नाहीं उरलें भानच प्रहरांचें
अवघडलेल्या ओठीं आलें देवाचें नांव
आठवणींतुनि समोर ठाके धन्य लोहगांव

लोहगांवाच्या राउळांतला नामाचा घोष
जनसामान्यां भावभक्तिचा चढला आवेष
मृदंगवीणा अविरत झडती झणाणती टाळ
वक्षावक्षावरीं डोलते तुळशीची माळ

प्रमोद वैभव बघुनि दिव्य तें दिपुनी शिव जाई
जिव्हेजिव्हेवरीं नाचते 'विठ्ठल-रखुमाई'
कांबळिवरती उभा मधोमध वैष्णव देहूचा
शिवरायातें बाहुनि घाली विळखा बाहूंचा

या स्पर्शानें पुलकित झाली राजांची काया
वृत्तीविण जन्मचि अवघा वाटे त्या वाया
नको जाहला त्यांचा त्यांना दिव्य राजवेष
शेला सोडुन दूर ठेविला झणीं खड्गकोष

विनित होउनी घट्ट कवळले तुकयाचे पाय
वदिली वाचा तुम्ही रक्षिलें संत बाप-माय
    बिरुदावलिचा गर्व वितळला विरे पातशाही
    सर्वांगीं मग भरुनि राहिली ' विठ्ठल रखुमाई '
अज्ञाताची ओढ लागुनी जीव होय आर्त
स्नानास्तव तों दिसे प्रभातीं स्थान चक्रतीर्थ
    जळीं भोंवरा बघतां मनिंचा विवेक त्या सांगे
    या चक्रासम फिरतो मानव संसारामागें
आरंभच या नाहीं कोठें नसेच कीं अंत
या भंवऱ्यांतुन एक वाचतो मोहमुक्त संत
    चक्रतीर्थीं त्या न्हाले शिवबा अटोपलें स्नान
    मुक्तकरांनीं दिधलें त्यांनीं दीनांना दान
भागानगरीं भाग्य मिरविलें वीर मराठ्यांचें
ठायीं ठायीं लवले मुजरे यवनी ताठ्यांचे
    गोवळकोंडें नमलें पायीं कर्नुल हो दीन
    शिवरायांच्या पायीं पडले पांच लाख होन

तरिही मुद्रा राजश्रींची प्रसन्न कां नाहीं
चिंतेंतच त्या चालत होते पथ ब्राह्मणभाई
तोंच बोलले राजे "येथुन श्री शैला जाऊं
मल्लिकार्जुना पाहूं भावें शिवदर्शन घेऊं
अनंतनगराकडे जाउं द्या सोबतच्या फौजा"
हलवुनियां दळ इशान्येस तो वळला शिवराजा
राजामागें सचिव निघाले हाकारित घोडीं
उलटी मागें पळूं लागली वाट नागमोडी
सुलट होउनी डोळ्यांपुढतीं धांवे इतिहास
शिवरायांचें स्मरण रेखितें आत्मचरित्रास
पुणें नगरिचें बाल्य पोरकें परित्यक्त माता
त्या मातेच्या सुखदुःखांची करुणामय गाथा
हती तिजला प्रीत पतीची, जनकाची माया
च होता वाली ईश्वर, गगनाची छाया
पुत्रावरतीं एकवटुनियां जन्माची आशा
सोसत होती माय जिजाऊ दुर्दैवा ऐशा

तिच्या मुखांतुनि ऐकियला मीं सीतावनवास
चंड पराक्रम पांडव गेले कैसे स्वर्गास

महाभारताअंतीं उरलें कृष्णकार्य कोठें
बळ समयाचें सदाच ठरलें मनुजाहुन

असेंच कांहीं असेल घडणें माझेंही अंतीं
सौख्य काय मग विजयाचें वा हरल्याची खंती ?

घोडदौडिनें निघे विरक्ती शिवबांच्या संगें
चित्तःशांती उलली पुरती जीवाशा भंगे


तशांत आला आठव त्यांना गेल्या मित्रांचा
परिणामातें आला पट मग अवघ्या चित्रांचा

तोंच पाहिलें शिखर शिवाचें आला श्रीशैल
दर्शनमात्रें त्याच्या झाले सर्व बंध सैल

चढतां चढतां कुणी बोललें उगीच शिवबास
' या शैलाच्या प्रवेशद्वारा म्हणती कैलास '

मनोवृत्तिला तीच वाटली मोक्षाची वाट
अबोल राजे चढत निघाले स्वर्गासी थेट

गाभाऱ्याच्या आंत पोंचली एकटीच स्वारी
नव्हता कोणी ब्राह्मण संगे दास कारभारी
जोतिर्लिंगावरी चालला होता अभिषेक
निवला अग्नी शिवचित्तींचा झाला हिमसेक
गाभाऱ्यांतिल अंधारा ये वेगळाच वास
पिंडीवरतीं शुभ्र फुलांची जन्ममुक्त रास
कळ्या कालच्या आज फुलुनियां आल्या मुक्त्यर्थ
हवा कशाला मलाच मग या देहाचा स्वार्थ
मंडपांतल्या स्तंभावरची चाळवली नक्षि
गगनपथानें उडूं लागले दगडाचे पक्षी
अबोल घंटा घुमवुं लागल्या अबोधसे नाद
शिवपिंडींतुन स्वरावांचुनी घुमे शंखनाद
छत्रपतींच्या नयनीं फुलल्या तेजस्वी ज्योती
कमरेवरची नग्न भवानी आली मग हातीं
शिरकमलानें आज करावी सांबाची पूजा
याच विचारें भारुनि गेला हिंदूंचा राजा



टेंकुनि जानू तळीं झुकविलें राजांनीं शीर्ष
कणकणांतुन त्या देहाच्या उफाळला हर्ष
निजहस्तानें कापणार ते अपुली जों ग्रीवा
हांक मारली तोंच कुणांशीं घेउनिया नांवा
कुणीच नव्हतें अंवतींभंवतीं हरवस्तु स्वस्थ
शिवरायाशीं बोलुं लागला अनंत हृदयस्थ
"कोण सांग तूं मारणार या थोर महात्म्याला ?
निःशस्त्राचा वध का शोभे तुज क्षत्रियाला ?

धर्मतीर्थ हें; नव्हे रणांगण, यांत काय अर्थ
स्वार्थासाठीं चिरशी कां तूं जिवंत परमार्थ
ह्या नसता तर नसता उरला भूमीवर धर्म ”
शिवरायांच्या सर्वांगावर थबथबला घर्म

भरे कांपरें शब्द फुटेना तोंडांतुनि कांहीं
गळुनी पडलें शस्त्र कधीं तें कळलें त्या नाहीं

हृदयस्थाचे बोल राहिले घुमतच त्या जागीं
“ नव्हेस राजा शिवराजा तूं खरा राजयोगी

तुझ्या वधाचा तुजसी नाहीं तिळभर अधिकार
आयुष्याचा तुझ्या शिवानें केला स्वीकार

शिवनिर्माल्या चुरूं पाहशी तूं कसला हिंदू
आत्महत्याच्या आणिक कुठल्या शब्दें तुज निंदूं

शस्त्रानें का तुटतो वेड्या आत्मा अविनाशी
जन्म सरावा म्हणुनि वार का चिंध्यांवर करशी

विहितकर्म तुज प्राप्तच करणें क्षात्रधर्म पाळ
बदलायाचें वस्त्र कधीं तें जाणें गोपाळ ”

हृदयस्थाचा साद थांबला उठले शिवराज
मुद्रेवरतीं दिसूं लागलें आगळेंच तेज
आंत पातले ब्राह्मणमंत्री मागोवा घेत
पुन्हा संचरे वैराग्याच्या राजा अंगांत
" वाटा दानें, बांधा मंदिर, गंगेवरिं घाट
मिळूं जाउनी सैन्यालागीं बघतें तें वाट "
हुकमासरशी लवले सारे भरुनी होकार
दुसऱ्या दिवशी सुरूं जाहलीं दानें देकार





का॰ ४

वैराग्यानें पुन्हा घेतला जुना राजवेष
त्या घटनेचा साक्षी नांदे अजुनी गंगेश

मनोरथाच्या तळीं उतरला मनांतला पार्थ
मनोनिवासी अनंत सांगे फिरुनी गीतार्थ

पूर्ण लागल्या ओळी, कळला त्यांच्यातिल अर्थ
तोच कृष्ण ती गीता सांगे, बदलतात पार्थ

स्वातंत्र्याचा सिद्धिविनायक वृद्धयुवा नेता
हिंदुत्वाच्या विशालतेचा ज्ञाता उद्‌गाता,
कृतार्थ चरणीं त्याच्या ठेवुन नम्रत्वें माथा
तच्चरिताची भावें स्पर्शिन मृत्युंजय गाथा.



गोदाकांठीं शिवरायांचें अवतरलें बाल्य
वडवाग्नीसम घेउन उदरीं दास्याचें शल्य.
त्या शल्यांतुन जन्मा आली वाणी जाज्वल्य
तिनें फुलविलीं मनें व्हावया प्रभुचें निर्माल्य.


विनायकांच्या भंवतीं झालीं अशीं मनें गोळा
देशभक्तिनें भारुन उठला एक मित्रमेळा.

93500

त्या मेळ्यानें मुक्त गायिलीं क्रांतीचीं गीतें
पुन्हां उठविला मर्द मराठा चेतविले नेते.

गडकोटांना पुन्हा जाहला शिवबांचा भास
साहित्यानें समर्थता दे नवा ' रामदास '.
शिवसामर्थ्यें उसळविला मग महाराष्ट्र देश
पुन्हां परतले शिवयुग बदलुन देहांचे वेष.

नायक झाला वीर विनायक अनुगामी सेना
पोवाड्यांनीं पुन्हां उभविला पडका कोंडाणा.



धन्य शिवाजी तो रणगाझी धन्यचि तानाजी
मुलांमुलांतुन संचरले मग बाजी, येसाजी.

स्वातंत्र्याचा प्रेषित झाला निजकार्यी दंग
नवयुवकांचा नवाच निर्मी सावरकर संघ.
मातृविमोचन ह्याच एकला तरुण मनां ध्यास
तोंच एकला विषय विचारां, त्याचा अभ्यास.

अभ्यासांतुन कृती उपजली एका शुभ वेळीं
तिलकसाक्षिनें धीर चेतवी दास्याची होळी.
होळीमाजीं जळुनी गेलें परदेशी वस्त्र
क्रांतिदेवते हातीं झालें सावरकार शस्त्र.


त्या शस्त्रानें अभिनव भारत निर्मियला गुप्त
महाराष्ट्रिं या धुमसुं लागलीं तरुण मनें तप्त.

: २ :

शिवनामांकित शिष्यवृत्तिचा लाभुनिया हात
पार करुनिया सागर गेले वीर लंदनांत.
साम्राज्याच्या गुहेंत शिरुनी नवखा सेनानी
सामर्थ्याची अयाळ ओढी कणखर हातांनीं.

साहित्यांतुन सहकाऱ्यांना घाली तो साद
वंगदेशिं तों उठे क्रांतीचा दिव्य शंखनाद.
कशीं पोचलीं शस्त्रें अस्त्रें भारत देशांत
फिरे विजेची रेघ जगाच्या थक्क नकाशांत.


स्वतंत्र भारत धजे चालवूं गोऱ्यांवर गोळी
भारतवर्षीं जागे क्रांति क्रुद्ध महाकाळी.
आंग्लाईच्या अन्यायां ना उरे ताळमेळ
हौतात्म्याची चालुन आली दैवदत्त वेळ.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 322403 दि: 3109
क्रमांक 925455 नों दि: 24314

परत निघाले वीर विनायक याया निजदेशीं
तोंच धावला देह अचानक सत्तेच्या पाशीं.
त्या पाशांतुन सुटुन उडी घे वीर सागरांत
फ्रान्स किनाऱ्यावरीं पोंचला, झाला यशवंत.

हाय परंतू! पुन्हां गवसला आंग्लांच्या हातीं,
रूप पालटे क्रांतिदेवता साकारे शांत.
दोन जन्म त्या सजा ठोठवी आंग्लांचा न्याय
हाय माउली भारतमाते! विधिघटने हाय!!



तो शौर्याचा सजीव पुतळा अजिंक्य सेनानी
बंदी म्हणुनी जाई विजनीं दूर अंदमानीं.

: ३ :

ज्याच्या स्कंधीं धुरा असावी अवघ्या देशाची
त्याच्या भालीं शिवळ बैसली दैवें घाण्याची.
दूर राहिले आप्त, अंतरें नित्यास्तव देश
देहीं भरल्या व्याधी, वरतीं बंदीचा वेष.

तरिहि तयाच्या सन्निध होती, कृष्णाची गीता
अवध्य आत्मा मानित नव्हता देहाची चिंता.
चार भिंतीच्या आंत कोंडलें वीराचें आयु
एकच होता परिचित संगें श्वासांतील वायु.

श्वासासंगें बोलुं लागली ज्ञात्याची बुद्धी
तोडुन कारा उभी ठाकली पुढें काव्यसिद्धी.
स्मृतिपटलावर उठूं लागल्या असंख्यात ओळी
कोण तयाना वाचिल नकळे आणि कधीं काळीं !

झोपीं गेला महावीर मग महाकवी जागे
पत्र, लेखणी वाचुन जमले काव्याचे धागे.

अक्षर वाङ्मय असें निर्मितां ओसरला काळ
दिव्यात्म्यानें शरिराचा त्या केला सांभाळ.

सुकुनी गेले अवघें यौवन घडल्याविण होम
तोंच घेउनी जलद थबकले माथ्यावर व्योम.
वाट पाहतां मृत्यूची ये, मुक्तीची वार्ता
एक जांभअी देअी तपानें एकांतीं गर्ता

पुनश्च पडला दृष्टीला त्या बद्ध मायदेश
पुन्हां एकदां उरीं उसळला दबला आवेश.

: ४ :

श्रीरामासम चौदा वर्षें भोगुन वनवास
परत परतले वीर विनायक बद्ध अयोध्येस.
घडलें त्याची उरीं रिचवुनी पार खंत, खेद
धर्मोद्धारासाठीं रचिले कालयोग्य वेद.

पतीतपावन नवें स्थापलें धर्माचें रूप
सागरसदृश विशाल केलें तातांचें कूप.
प्रलोभनाचा मोह न मानी शिणलें कर्तृत्त्व
उभें ठाकलें अविचल जागीं विशुद्ध हिंदुत्त्व

शस्त्र शिक्षणा सन्मुख केले पुन्हा सर्व हिंदु
साहित्यांतून एक निर्मिला नवा धर्मसिंधु.

●

द्विखंड झाला देश, स्वीकरी सत्ता गणतंत्र
सिद्ध जाहला जन्मभरीं जो जपला मनिं मंत्र
अभिनव भारत करी सांगता, अपुल्या कार्यांची
लक्ष मुखांनीं स्मृती गायिली त्याच्या शौर्याची.

स्थिर डोळ्यांनीं पाहात राही वृद्धयुवा भीष्म
वसंत होता मनीं उमलला, माथ्यावर ग्रीष्म.
स्वयें आपुल्या सर्वस्वाचा साधुनिया होम
उभा राहिला वीर विनायक योद्धा निष्काम.

आकाशाहून विशाल भासे, त्याचें व्यक्तित्व
कर्पुरसे जो जाळी अपुलें अवघें कर्तृत्त्व
चिरंजीव हा हैतात्म्याचा विजयी अभिमान
इतिहासाविण कुणीं करावा याचा सन्मान ?

● ● ●

# कन्याकुमारी

दूर दक्षिण दिशेला
जंबुद्वीपाच्या पायाशीं
एकमेकांत मिळाले
जेथें तीन वारिराशी

एका नीलिम्यास जेथें
लक्षावधि आल्या छटा
तेथें पांढऱ्या वाळूंत
उभा प्राकार एकटा

त्याच प्राकाराच्या पुढें
सूर्य पाण्यांत उजळे
पाण्यावर प्रकाशून
त्याच पाण्यांत मावळे

असें दृश्य दिसे डोळां
जगीं एकाच ठिकाणीं
तेथें निसर्ग उघडी
सौंदर्याच्या रत्नखाणी

मऊ मोत्यांच्या वाळूंत
ऊन सांडतें हीरक
सागरांत फेसाळते
नील वैडुर्यांचें पीक

पाच मण्याच्या चवऱ्या
तेथें ढाळतात माड
उषा, संध्या हलविती
हिऱ्या–माणिकांचें झाड

कधीं प्रभात फेंकते
पाचांवर पुष्कराज
कधीं चांदण्यानें न्हातो
अंधाराचा गजराज

चळ्या ढळत्या स्वरांत
तेथें गातात लहरी
स्वरविस्तार वेगळा
राग एक ‘आसावरी’



प्राकाराच्या गाभाऱ्यांत
तेथ नांदे रूप–राणी
शिल्पमय प्रेमकथा
कन्याकुमारी देखणी

किती युगें कोण जाणे
कुमारी ती आहे उभी
तिच्या हातीं पुष्पहार
दृष्टि जडलेली नभीं

फार प्राचीन काळींची
रूढ लोकीं लोककथा
दूर दक्षिण देशींची
गाते सांगते जनता

सिंधु – सागराची कन्या
वय सोळाची कुमारी
तिच्या लावण्याची किर्ति
दरवळे जगभरीं

तिच्या शीरीं बागडती
जलवलयांचे केश
पारदर्शक पाण्याचा
तिचा निळसर वेष

मत्स्याकृति नेत्र तिचे
नक्रमिठीची नजर
फेनधवल, जरीचे
तिच्या साडीचे पदर

तिच्या लाडिक ओठांत
गूज उषा-अरुणाचें
इंद्रधनुष्य आकारें
तिच्या भुंवई–मोडीचें

लचकतां मुरकतां
आरस्पानी अंगवठा
तिच्या उरींच्या ताठ्यांत
उंच उसळती लाटा

वरीं अस्वस्थ खळती
चंद्र तारकांचे हार
तिच्या अंगीं मुसमुसे
रूप-गुणांचें भांडार

तिच्या पदराचा शेंव
शिवे बोलक्या वाऱ्यांना
त्यांनीं सांगितली मात
तिन्ही लोकांत साऱ्यांना

" सिंधुसागराची कन्या
तिन्ही लोकांत देखणी
तिच्या अथांग मनाची
खोली आजमावी कोणीं "

●

नक्षत्रांच्या उजेडांत
देव न्याहाळिती तिला
पाताळींच्या दानवांचा
थवा भूमीवरी आला

देव, दानव दोघेहि
तिला पाहून भुलले
अलभ्याच्या लाभासाठीं
हाडवैरी एक झाले

तिचें मन मंथायाचा
बेत जाहला निश्चित
तिच्यासाठीं देव–दैत्य
झाले अधीर मन्मथ

मनामनांच्या मेरूला
जडे वासना वासुकी
तेच झाले रवी, दोरी
शक्ति लागल्या सार्थकीं

अनंताची अथांगता
तसें कुमारीचें मन
देव-दानव काढिती
शक्तिसर्वस्वें मंथून

कुणा एकाला सांपडे
तिच्या डोळ्यांचे चांचल्य
'लक्ष्मी' रूप हातीं आलें
त्याच्या जन्माचें साफल्य

कुणीं एकानें स्पर्शिलें
तिच्या यौवनाचे कुंभ
तोच स्पर्श त्याच्या उरीं
झाला अमोल 'कौस्तुभ'

कुणीं एकानें धरिला
तिचा सुगंधित हात
त्यानें रोविला नंदनीं
रोमांचांचा पारिजात

कुणा एकाच्या ओठांनीं
केला गालांशीं एकांत
तृप्त होऊन बोले तो
'मला लाभलें अमृत'

तिच्या चरणींचा चाल
मोह घाली एका जीवां
त्याच भावनेचा त्यानें
अश्व केला 'उच्चैःश्रवा'

तिच्या पदांचें चुंबन
लाभे अज्ञात असुरां
त्यांच्या अंगाअंगांतून
तीच चढूं लागे 'सुरा'

तिच्या सान्निध्यानें योग्यां
मिळे वासना माघारीं
सुटे सांगत तो वेडा
'मज लाभे 'धन्वंतरी'

तिच्या वाणीचें संगीत
कोणी ऐके मधु मंद्र
तोहि बरळला मोदें
'मला लाभलासे 'चंद्र'

कोणां एका मोह घाली
तिचा मुंबई–नखरा
त्यानें सांगीतली मात
मला लाभल्या 'अप्सरा'

बारा बावळ्यांना मिळे
बारा विशेषांची जाण
तेरावाहि शोधूं लागे
रूपरत्नांची ती खाण



*

कन्या कुमारीचा जीव
केला तयांनीं घाबरा
एकालाहि अंतरंगीं
तिनें दिला नाहीं थारा
कुणीं एकालागीं तिनें
अंगभर दिला भार
'रत्न लाभलें मलाहि'
बोले निःसंग लाचार
नाहीं कुणाला कळलें,
पुरें कुमारीचें मन
देव-दानव शिणले
व्यर्थ 'अनंत' मंथून

●

लाभलेल्या सहवासां,
रत्नलाभ समजुनी
सुरासुर धन्य झाले
गेले आपुल्याल्या स्थळीं

सुरासुरांच्या मायेला
नाहीं भाळली कुमारी
तिच्या सर्वस्वाचा कोणी
नाहीं झाला अधिकारी

तिच्या मनमंथनाचें
गेलें संपूनिया पर्व
दिसामासीं वाढूं लागे
कुमारीचा रूप–गर्व

" रूपगर्वीता कन्या ही
व्हावी कोणासाठीं कांता "
सिंधुसागराच्या मनीं
वाढवसी वाढे चिंता

कुमारीच्याहि मनांत
कांहीं गूढ खळबळ
सागराच्या दारीं आले
तोंच भरासी नारळ



नारळाच्या बनांतून
फिरूं लागली कुमारी
कांहीं तरी दुखूं लागे
तिच्या ताठर अंतरीं

नृत्य गोठलें पदांचें
उषा डोळ्यांत कोमेली
आरस्पानी अंगकांती
गूढ दुःखानें पोळली

जनकाच्या मायेमाजीं
घेई कुमारी लोळण
डोळा झाकला तरीहि
मनीं उरे जागरण

चढे उतरे आवेग
तिच्या उरीं दिनरात
वेड्यापरी लोळे कन्या
सदा अशांत अशांत

येउनिया गेले त्यांचा
तिला होईना आठव
नाहीं आला त्याच्यासाठीं
झिजूं लागलें सौष्ठव

झाली अस्वस्थ कुमारी
झाला अस्वस्थ सागर
झालें स्वास्थ्यहि अस्वस्थ
हादरले दोन्ही तीर

एके दिवशीं सागर
पाठीं फिरवून हात
पुसे आपुल्या लेकीला
तिच्या अंतरींचा हेत

प्रश्न ऐकतां पित्याचा
रडूं लागली कुमारी
अश्रु जळत्या अग्नीचे
तिच्या सांठले पदरीं

स्फुंद स्फुंदूनिया सांगे
लेक लाडकी बापाला
‘ कशी माळ घालूं सांगा
लोभी मनांच्या पापाला ? ’

देव दानवांनीं केली
माझी दुष्ट विटंबना
मला मो ;वील ऐसा
कुणी पुरुष भेटेना–

'तुम्हां वांचुनिया जगीं
कोण नांदली सरिता ?
पौरुषाची ओढ सांगे
जन्म नारीचा जन्मतां

मला भुलवी ऐसा
कुणी स्वप्नींहि येईना
माझी मलाच असह्य
झाली अघोर वंचना'

पुन्हां रडत रडत
घेई लोळण कुमारी,
लाटा आपटूं लागल्या
पितृनेत्रांच्या किनारीं

दोघांच्याही निःश्वासांचा
घुमूं लागे एक घोष
पिता-पुत्री दोघे दुःखीं
देती अदृष्टाला दोष

त्यांच्या निःश्वासानें झालें
दिशा दिशांत वादळ
वाळू उडाली आभाळीं
अवकाशी धांवे धूळ

जंबुद्वीपाची दक्षिण
लागे दुःखानें हादरूं
कडाकडा कोसळले
भूमीवरीं उंच तरु

आवर्तात अडकले
वेड लागलें वाऱ्यांना
त्याच्या घोर आक्रोशानें
छळ भरला ताऱ्यांना

आला आलासा वाटला
स्थिरचरांना प्रळय
दक्षिणेच्या दुःखभारें
हलं लागे हिमालय

हिमालयाच्या मस्तकीं
जागा झाला शिवयोगी
एकाएकीं उभें झालें
सुप्त सामर्थ्य विरागी

प्रलयाच्या जाणिवेनें
पुलकित झाला भोळा
त्याच्या भाळीं उघडला
ज्ञानरूप तिजा डोळा

शुभ्र अंगांत भरली
प्रलयाची रुद्र-लय
धुंद नाचत नाचत
उतरला हिमालय

आले दक्षिण दिशेला
त्याच्या डमरूचे स्वर
एकाएकीं स्तब्ध झाला
क्षुब्धमनस्क सागर

सागराच्या मायेवर
होती लोळत कुमारी
तिचे थांबले निःश्वास
उठे, पदर सांवरी

एकाएकीं उजळल्या
झळाळल्या अष्टदिशा
कुमारीच्या मानसांत
प्रकाशित झाल्या आशा

नाद जवळिं येतो, हें
तिनें ओळखिलें कानीं
पितापुत्री दोघे आले
तीरावरच्या पुलिनीं

कुमारीच्या डोळ्यांपुढें
तेज फांके भयंकर
उभा आपाद मस्तक
महादेव दिगंबर !

अनुक्रम 32245 वि: काव्य
क्रमांक 15545 नों दि 25-3/5

एक भरारी मारून
पडे मरून अंधार
कोसळत्या कुमारीला
देई सागर आधार

उभ्या जन्मांत एकदां
रूपगर्विता लाजली
कांहीं अबोध रूपले
तिच्या अल्लड अंचलीं

हवा होता त्याचें तिला
आज घडलें दर्शन
उभी राही रूपवती
स्वतःलागीं सांवरून

पौरुषाचें रौद्र रूप
तिनें धैर्यानें पाहिलें
दिगंबर मूर्तिपुढें
हात आदरें जोडिले

तिच्या अथांग मनांत
एक खेळली लहर
शब्दरूप झाला ओंठीं
एक अधीर विचार

" वाट होती एक तुझी-
तुझ्यासाठीं जन्म माझा
पौरुषाच्या पुण्यमूर्ति !
तूंच हृदयाचा राजा "

शिवनर्तन थांबलें
मुकें करांत डमरू
स्वातिपर्जन्यासारखी
शिववाणी लागे झरूं-

" ऐक सागर-कन्यके
मी न भोगाचा भुकेला
हिमालयाहून आलों
तुज शुद्ध करण्याला ! -

तुझ्या उरींचा दावाग्नि
देवदैत्यें डिंवचला
तुझ्या जलमय देहीं
दाह तयांनीं भरला

तुझ्या सौंदर्याचीं रत्नें
त्यांनीं घेतलीं चोरून
तुझ्या देहांत ठेविले
सर्प भोगाचे भरून

त्यांच्या अनीतीनें आली
तुझ्या देहांत हीनता
तीच टाकीन प्राशुनी
तुला देईन शुद्धता !"

अबोध त्या वक्तव्यानें
झाली कुमारी अबोल
पित्याशेजारीं राहिली
मूर्ति सारखी निश्चल

पुढें आला आवेगानें
शिवयोगी विरुपाक्ष
त्यानें चुंबिली कुमारी
तिच्या जनकासमक्ष !



तिच्या वासनेचा दाह,
त्याच्या गळ्यांत भाजला
कणकण कुमारीचा
वेड्या आशेनें लाजला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.



तिच्या वासनेचें विष,
रुद्र प्राशितां आकंठ
दाह शमला तियेचा
शिव झाला नीलकंठ

गेली जवळ कुमारी
निज नाथाशीं बोलाया
परी वाणीची आढ्यता,
फोल, फोल झाली वांया

'नाथ–' एवढ्या हांकेनें,
जरा शहारला रुद्र
पिंगवर्ण जटेमाजीं
सौम्य उजळला चंद्र—

गेली धांवत कुमारी
आली घेउनिया माळ
तिला हातानें थांबवी
महायोगी भूतपाल

" विश्वांतला हीनपणा
देवां दैत्यां अनिवार्य
त्याचा नष्टांश करावा
एवढेंच माझं कार्य "
—शिववाणीस विनवी,
तोंच कुमारीचा स्वर
" तुम्ही माझे प्राणनाथ,
लक्ष जन्मांचे भ्रतार
तुम्हांसाठीं आणिला मीं,
नऊ नक्षत्रांचा हार
होऊं द्या ना सप्तपदी,
देवा, थांबा क्षणभर
माळ घालावया धांवे
कन्याकुमारी अधीर
त्याचक्षणीं गुप्त झाला
महादेव दिगंबर

‘ शिव शिव– ’ शब्द उठे,
तिच्या पोंवळयाच्या ओंठीं
वशिवाक्य एक आलें,
वाऱ्यांतून तिच्यासाठीं
“ विश्वशुद्धीचें सत्कार्य,
जधीं करीन मी पूर्ण
तुज स्वीकाराया आर्यें
जवें येईन मी धांवुन ! ”
अशरीरिणी ती वाणी,
तिचे बधिरवी कान
आणि थिजल्या देहाचा,
झाला क्षणांत पाषाण.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 32263 वि: ...
क्रमांक 1555 नों दि 25454

का व्य क था

अजुनि नाहीं झाली;
शिव संकल्पाची पूर्ति
माळेसह उभी आहे
‘ कन्याकुमारी ’ ची मूर्ति



REFBK-0013500
REFBK-0013500

चौ ऱ्या ऐं शी